# महाराष्ट्र शासन
# वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान सामाई प्रवेश परीक्षा
## एमएच-सीईटी २०१५
## प्रेस नोट

**दिनांक : ०५ जून, २०१५.**

महाराष्ट्र शासनामार्फत आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांसाठी सामाईक प्रवेश परीक्षा (एमएच-सीईटी-२०१५) गुरुवार, दिनांक ०७ मे, २०१५ रोजी घेण्यात आली होती.

एमएच-सीईटी-२०१५ प्रवेश परीक्षेचा निकाल **शुक्रवार, दिनांक ०५ जून, २०१५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता** जाहीर करण्यात येणार आहे. तसेच सदरचा निकाल संचालनालयाच्या **www.dmer.org** आणि **www.mhcet-exams.co.in** या संकेतस्थळावर विद्यार्थी व पालकांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सदर प्रवेश परीक्षा राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्यावतीने महसूल, शिक्षण, वित्त व गृह विभागाच्या सहकार्याने पार पाडण्यात आली.

सामाईक प्रवेश परीक्षा-२०१५ सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी एकूण ५०७ **केंद्रावर** घेण्यात आली. प्रवेश परीक्षेला एकूण १८९०५० उमेदवार उपस्थित होते. त्यामध्ये मुलांची संख्या ८४९२९ व मुलींची संख्या १०४१२१ एवढी आहे.

राज्यातून आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमासाठी वैधानिक विकास मंडळ निहाय, परीक्षेस बसलेल्या व त्यापैकी वैद्यकीय, दंत अभ्यासक्रमासाठी तीनही विभागातील पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| **विभाग** | **बसलेले उमेदवार** | **पात्र उमेदवार** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| उर्वरित महाराष्ट्र | ११०४०४ | १९६८९ | १७.८३% |
| विदर्भ | ३७३१५ | १०२३९ | २७.४४% |
| मराठवाडा | ४१३३१ | ९४०० | २०.८०% |

सदर प्रवेश परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे व त्यानुसार तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीनुसार **आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जुन महिन्याच्या शेवटच्या आठवडयात विद्यार्थ्यांकडून प्रेफरन्स फॉर्म भरुन घेण्याची प्रक्रिया महाराष्ट्रातील ग्रॅन्ट वैद्यकीय**

**महाविद्यालय, मुंबई, बै.जी. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद या ४ विभागीय प्राधिकाऱ्यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे.** याबाबतचे नोटीफिकेशन वृत्तपत्रातून व संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन जाहिर करण्यात येईल. पुशूवैद्यकीय व मत्स्योत्पादन या अभ्यासक्रमाचे प्रवेश रजिस्ट्रार, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेमार्फत करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने प्रवेश प्रक्रियेची माहिती संबंधित कार्यालयांमार्फत जाहीर करण्यात येईल.

एमएच-सीईटी २०१५ च्या प्रवेश परीक्षा व्यवस्थितरित्या पार पाडण्याकरीता महसूल, शिक्षण, वित्त व गृह विभागांनी सहकार्य दिले त्याबद्दल सक्षम प्राधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई त्यांचे आभारी आहेत. तसेच विद्यार्थी आणि पालक यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल शासनाच्या वतीने त्यांना धन्यवाद देण्यात येत आहेत. प्रवेश परीक्षेच्या विविध टप्प्याना विस्तृत प्रसिध्दी देण्यात वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया यांनी महत्वाची भूमिका बजाविली त्याबद्दल शासन त्यांचे आभारी आहे.

**:: :: :: :: ::**